आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१० जून २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- नरेंद्र मोदी हे भारताचं प्रधानमंत्रीपद सर्वाधिक काळ पद भूषवणारे नेता ठरणं, हे त्यांच्यावरच्या जनविश्वासाचं प्रतीक असल्याची राष्ट्रपतींची प्रशस्ती

- विकसित भारताच्या संकल्पनेच्या पूर्ततेसाठी एनडीए नव्या उत्साहानं एकत्रितपणे काम करेल असा प्रधानमंत्र्यांचा विश्वास

- गुजरातमध्ये अहमदाबाद इथल्या मेट्रो २ ए च्या विस्ताराला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

**आणि**

- ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक भारती राजा यांचं निधन

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे भारताच्या प्रधानमंत्रीपदी सर्वाधिक काळ राहणारे नेते ठरले आहेत. मोदी यांनी प्रधानमंत्रीपदी तब्बल ४ हजार ३९९ दिवस पूर्ण केले आहेत. त्यांनी देशाचे पहिले प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू यांचा सर्वाधिक काळ प्रधानमंत्रीपदी राहण्याचा विक्रम मोडला. नेहरू हे ४ हजार ३९८ दिवस देशाचे प्रधानमंत्री होते.

सर्वाधिक काळ प्रधानमंत्रीपद भूषवल्याबद्दल नरेंद्र मोदी यांचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्यासह देशविदेशातल्या मान्यवरांनी अभिनंदन केलं आहे.

मोदी यांनी सर्वाधिक काळ प्रधानमंत्रीपद भूषवणं हे लोकांच्या त्यांच्या नेतृत्वावर असलेल्या विश्वासाचं प्रतीक आहे, असे गौरवोद्गार **राष्ट्रपती** द्रौपदी मुर्मू यांनी काढले. प्रशासन, अर्थव्यवस्था आणि सामाजिक परिवर्तन यातल्या प्रगतीमुळे मोदी यांचा कार्यकाळ वैशिष्ट्यपूर्ण ठरला, या काळात त्यांनी लोककल्याणकारी

योजना राबवल्या असून विकास तळागाळापर्यंत पोहचला, असं म्हणत राष्ट्रपतींनी प्रधानमंत्र्यांचं अभिनंदन केलं.

लोकसभेचे **सभापती** ओम बिर्ला यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन केलं. मोदी यांच्या कार्यकाळात संविधानिक मूल्यं, संसदीय लोकशाही, आणि लोकशाही संस्था सक्षम झाल्या असं बिर्ला म्हणाले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, परराष्ट्र व्यवहार मंत्री  एस. जयशंकर, पीयूष गोयल, निर्मला सीतारामन, शिवराजसिंह चौहान यांच्यासह इतर मंत्र्यांनी, मोदी यांचं, अभिनंदन  केलं आहे. सर्वाधिक कार्यकाळ लोकनियुक्त प्रधानमंत्री म्हणून काम पाहणाऱ्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन करणारा प्रस्ताव केंद्रीय मंत्रिमंडळानं आज मंजूर केला.

**<><><><><>**

भारतात सर्वाधिक काळ आणि सलगपणे निवडून आलेले प्रधानमंत्री होण्याचा विक्रम नरेंद्र मोदी यांनी  केल्याबद्दल राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं आज त्यांचा गौरव करणारा ठराव मंजूर केला. नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं आज एनडीए सरकारच्या १२ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त विशेष बैठक झाली. या बैठकीत प्रधानमंत्री मोदी यांच्या अभिनंदनाचा ठराव आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी मांडला.

एनडीएचा प्रवास राष्ट्रीय हित आणि प्रादेशिक आकांक्षांना प्राधान्य देण्याच्या सामूहिक निर्धारानं होत असल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितलं. गेल्या १२ वर्षांत एनडीएनं देशाला स्थिर सरकार दिलं असून विविध क्षेत्रांमध्ये प्रगती  केली आहे. विकसित भारताच्या संकल्पनेच्या पूर्ततेसाठी एनडीए नव्या उत्साहाने एकत्रितपणे काम करेल असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या बैठकीला एनडीएतील सर्व घटक पक्षांचे प्रमुख तसंच एनडीएची सत्ता असलेल्या २२ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांतील मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्रीही बैठकीत उपस्थित होते.

**<><><><><>**

जागतिक नेत्यांकडूनही मोदी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतानं मोठं लक्ष्य गाठलं असून त्यापुढचा टप्पा गाठण्यासाठी भारत सज्ज आहे, असं युरोपियन संघाच्या अध्यक्ष उर्सुला वेन डोर यांनी म्हटलं आहे. तर, मोदी यांनी भारताच्या आर्थिक आणि विकासात्मक प्रगतीला दिशा दिली आणि भारताची जागतिक प्रतिमा उंचावण्यात महत्वाची भूमिका बजावली असं दक्षिण केरियाचे अध्यक्ष ली जेई म्युंग यांनी म्हटलं आहे. ऑस्ट्रेलियाचे माजी प्रधानमंत्री स्कॉट मॉरिसन यांनी म्हटलंय की, नरेंद्र मोदी यांनी भारताच्या अर्थव्यवस्थेत सुधारणा केल्या आणि देशाला जागतिक पातळीवर सक्षम केलं.

इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी, डेन्मार्कचे प्रधानमंत्री मेट्ट फ्रेडरिक्सन, तसंच सायप्रस, पपुऐ न्यू गिनी, भूतान, नेपाळ, श्रीलंका, मलेशिया, नायजेरिया, मालदीव, अशा देशोदेशीच्या राष्ट्रप्रमुखांनी मोदी यांचं अभिनंदन केलं आहे.

अमेरिकेतले अनेक लोकप्रतिनिधी, उद्योजक आणि भारतीय वंशाच्या नागरिकांनीही मोदी यांचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा सर्वाधिक दिवसांचा विक्रमी कार्यकाळ हा देशाचा सुवर्णकाळ असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत बोलत होते. महाराष्ट्राला मोदींनी भरभरून दिलं, असं सांगून ते म्हणाले की २०१५च्या दुष्काळात केवळ महाराष्ट्राला बळिराजा योजना शेतकऱ्यांसाठी त्यांनी दिली. वाढवण प्रकल्पासारख्या अनेक पायाभूत सेवा सुविधा राज्याला या काळात मिळाल्या असं सांगून त्यांनी

महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीनं मोदी यांचे आभार मानले. देशाचे पहिले प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू यांच्याशी मोदींची तुलना करायची नाही परंतु नवभारताच्या निर्माणामधे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं स्थान अढळ आहे असं फडणवीस म्हणाले....

**होल्ड- फडणवीस**

**<><><><><>**

गुजरातमध्ये अहमदाबाद इथल्या मेट्रो २ ए च्या विस्ताराला आज केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर बातमीदारांशी बोलताना ही माहिती दिली. सुमारे २ हजार १६९ कोटी रुपये खर्चाच्या या टप्प्यात सहा किलोमीटर लांबीचा मेट्रो मार्ग आणि पाच स्थानकं यांचा समावेश असेल. २ ए हा टप्पा कार्यान्वित झाल्यानंतर अहमदाबाद-गांधीनगर दरम्यान ७७ किलोमीटरपेक्षा जास्त सक्रिय मेट्रोसेवा उपलब्ध होईल, असंही अश्विनी वैष्णव म्हणाले.

आंध्र प्रदेशात अमरावती इथे सामायिक केंद्रीय सचिवालय आणि केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी निवासी संकुलं उभारण्याच्या एकूण २ हजार ५३४ कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाने आज मंजुरी दिली.

**<><><><><>**

तमिळ चित्रपट सृष्टीतले प्रसिद्ध दिग्दर्शक भारती राजा यांचं आज चेन्नई इथं प्रदीर्घ आजाराने निधन झालं. ते ८४ वर्षांचे होते. ग्रामीण भागातलं नैसर्गिक सौंदर्य चित्रपटाच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडणं ही भारती राजा यांची खासियत होती. आपल्या कारकिर्दीत त्यांनी तमिळ चित्रपटसृष्टीत नवीन प्रवाह निर्माण करून मोठा बदल घडवून आणला. चित्रपटांच्या नायकांची चर्चा होण्याच्या काळात भारतीराजा यांच्या संपूर्ण चित्रपटाचीही तितकीच चर्चा होत होती. त्यांच्या बहुतेक चित्रपटांचं संगीत दिग्दर्शन संगीतकार इलय्याराजा यांनी केलं होतं. ते तेलगू, हिंदी आणि

कन्नड चित्रपटसृष्टीतही परिचित होते. सोलवा सावन, रेड रोज, लव्हर्स, सवेरेवाली गाडी, फायनल कट हे त्यांचे हिंदीत प्रदर्शित झालेले चित्रपट. त्यांच्या नावावर सहा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, चार फिल्मफेअर पुरस्कार आणि सहा तमिळनाडू राज्य चित्रपट पुरस्कार आहेत. २००४मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं होतं. तमिळनाडूचे मुख्यमंत्री जोसेफ विजय यांनी चेन्नई इथे भारती राजा यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना श्रद्धांजली वाहिली.

**<><><><><>**

देशात सीएनजी अर्थात कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅसचा तुटवडा नाही असं केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी स्पष्ट केलं आहे. देशात घरोघरी पीएनजी अर्थात पाईपद्वारे नैसर्गिक वायूचा पुरवठा वाढवला असून एलपीजी जोडण्यांना पीएनजी जोडण्यांमधे रुपांतरित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असं पुरी यांनी सांगितलं. गॅसचा कृत्रिम तुटवडा तयार करून आणि चुकीची माहिती पसरवून काही लोक परिस्थितीचा गैरफायदा घेत आहेत, अशा लोकांविरुद्ध सरकारनं कारवाई केली आहे, असं त्यांनी सांगितलं.

**- होल्ड बाईट पुरी - -**

**//<><><><><>//**